महाराष्ट्र शासन
विभागीय आयुक्त यांचे कार्यालय अमरावती
बायपास रोड, कॅम्प, अमरावती ४४४ ६०२
दूरध्वनी ०७२१२६६२०६२ फॅक्स ०७२१२६६२७८२
ईमेल –dcg_amravati@rediffmail.com वेबसाईट ://amravatidivision.gov.in

क्र.सा.प्र./जी.बी.-१/युसीसी/कावी- /२०२५ **दिनांक २१.११.२०२६**

प्रति,

विभागीय उपसंचालक,
माहिती व प्रसिध्दी कार्यालय,
अमरावती

विषय:- समान नागरी कायद्याबाबत (UCC) अमरावती विभागाच्या जनसुनावणीचे आयोजनाबाबत

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, समान नागरी कायद्याबाबत (UCC) विविध हितसंबंधी गट, संस्था व नागरिकांच्या सूचना, हरकती आणि मते जाणून घेण्यासाठी गठित करण्यात आलेल्या समिती द्वारे अमरावती विभागाच्या जनसुनावणीचे आयोजन दि.29.11.2026 रोजी करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने अमरावती विभागातील सर्व जिल्हयांमध्ये प्रकाशित होणाऱ्या वृत्तपत्रांमध्ये यासोबत संलग्नीत जाहीर प्रकटनास दि.22.11.2026 रोजी व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. सदर जाहीर प्रकटन वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाल्याचे कात्रणे या कार्यालयास सादर करण्यात यावेत.

(मा.विभागीय आयुक्त यांचे मान्यतेने)

सहपत्र:- वरीलप्रमाणे

(वासंती माळी)
अपर आयुक्त (सा.प्र.)
विभागीय आयुक्त कार्यालय
अमरावती

<u>जाहिर प्रकटन</u>

अमरावती विभागातील नागरीकांना जाहिर आवाहन करण्यात येते की, समान नागरी कायद्याबाबत (UCC) विविध हितसंबंधी गट, संस्था व नागरिकांच्या सूचना, हरकती आणि मते जाणून घेण्यासाठी गठित करण्यात आलेल्या समिती द्वारे अमरावती विभागाच्या जनसुनावणीचे आयोजन नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. सदर जनसुनावणीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	दिनांक	जिल्हा	वेळ	स्थळ
०१	२९.११.२०२६	अकोला	सकाळी ११.०० ते १२.००	१. नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती (समक्ष) २. संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय (व्ही.सी. द्वारे)
०२		वाशिम	सकाळी १२.३० ते दुपारी ०१.३०	
०३		बुलढाणा	दुपारी ०२.३० ते दुपारी ०३.३०	
०४		यवतमाळ	दुपारी ०४.०० ते सायं. ०५.००	
०५		अमरावती	सायं. ०५.३० ते सायं. ६.३०	

संबंधित गट, संस्था यांचे प्रतिनिधी आणि नागरिक यांना नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती / संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय येथे निर्धारित दिवशी, निर्धारित वेळेपुर्वी १ तास सुनावणीकामी समक्ष उपस्थित राहता येईल. नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथील उपस्थितांची सुनावणी समितीसमोर समक्ष घेण्यात येईल व संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित राहणाऱ्या नागरीकांची सुनावणी व्हि.सी. व्दारे घेण्यात येईल.

तसेच, ज्या नागरीकांना केवळ ऑनलाईन पध्दतीने आपले मत सादर करावयाचे आहे. त्यांना महाराष्ट्र शासनाच्या https://ucc.maharashtra.gov.in/ या पोर्टलवर ३७ मुद्दयांची माहिती देता येईल.

स्वा/-

(नयना गुंडे)

विभागीय आयुक्त

अमरावती